# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटणमध्ये उद्यापासून तीन दिवसांचा 'पाटण महोत्सव' रंगणार

## करमणूक, प्रदर्शन, सेलिब्रिटींची उपस्थिती; नागरिकांसाठी आकर्षणांची मेजवानी

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**पाटण, दि. २६ :** पाटणला तीन दिवस पाटण महोत्सव मध्ये करमणुकीच्या कार्यक्रमांचा धुरळा उडणार असून, 'खेळ पैठणीसह, जगदंब फोक अख्यान.व सामुहिक डान्स सादरीकरणासह सिनेअभिनेत्री कल्याणी नंदकिशोर सह सिनेअभिनेते समृद्धीबाबा जाधव यांचा 'हसण्यासाठी जन्म आपला ' अशा विविध कार्यक्रमाचा पाटण तालुका वासियाना लाभ मिळणार आहे.

कोयना एज्युकेशन सोसायटी व रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने दि २८ फेब्रुवारी ते २ मार्च पर्यंत पाटणला ' पाटण महोत्सव ' या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवात भव्य प्रदर्शन व विक्री व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचाही समावेश करणेत आला आहे.

■ व्यापारी, उद्योजक, कला, खाद्य, कृषी असे स्टॉल असणार आहेत. जवळपास सगळे स्टॉल बुकिंग झालेले आहेत. पंढरपूर चा तपेला बैल, बंगाली कॅट, विविध प्रकारच्या कोंबड्या, शेतकर्यांना आधुनिकता लहानांपासून थोरांपर्यंत लोकांचा विचार करुन त्या त्या गोष्टी समाविष्ट केलेल्या आहेत. महिलांसाठी पैठणीचा खेळ आयोजित केला आहे. व्यापारी खरेदीसाठी येणार्या ग्राहकांसाठी लकी ड्रा कूपन ठेवलेले आहे. सेलिब्रिटी येणार आहेत.

बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण, हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजच्या प्रांगणात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान या महोत्सवात कृषी प्रदर्शनासह इतर संसार उपयोगी साहित्य व खाद्यपदार्थांसह पुस्तकांचेही स्टॉल पाहायला मिळणार आहेत. यात विविध महिला बचत गटांचेही खाद्यपदार्थ व वस्तुचे स्टॉल उभारले जाणार आहेत.

बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे, रो. जगदीश शेंडे, सह समन्वयक डॉ. पी वाय फडणवीस, समन्वयक डॉ. एच व्ही काटे, डॉ.दीपक डांगे, डॉ. विनायक राऊत, प्रा. व्ही एस माथणे, डॉ. एस पी पाटील, प्रा. अनिल पाटील व रोटरी क्लब यांच्या पुढाकाराने आणि सहकार्याने सदर कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरु आहे.

महोत्सवात खास पाटण वासियांसाठी मनोरंजनाचा केंद्रबिंदू असलेल्या विविध करनमुकीच्या कार्यक्रमांचाही सहभाग करणेत आला आहे .

दि.१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता लागिर झाल फेम कल्याणी नंदकिशोर यांचा महिलांसाठी ' खेळ पैठणीचा ' सायंकाळी ४ वाजता स्वरसह्याद्री ग्रुपचा संगित मैफिल व सायंकाळी ६ वाजता संगित लोकधारा प्रस्तुत लोकगितांवर अधारित ' दि जगदंब फोक अख्यान' हा कार्यक्रम होणार आहे

दि, २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता सामुहिक डान्स सादरीकरण हा लावणी कथक या नृत्यप्रकारावर आधारीत कार्यक्रम. व सायंकाळी ६ वाजता सिनेअभिनेते समृद्धी जाधव यांचा ' हसण्यासाठी जन्म आपला' हा बहारदार कार्यक्रम पाहायला मिळणार आहे अशी माहिती कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर यांनी दिली.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने मुळे हा कार्यक्रम होत आहे अस प्रा. डॉ. काटे मॅडम यांनी सांगितले.